# प्रेस नोट

## ४०वी वरिष्ठ राष्ट्रीय आर्चरी स्पर्धा - २०२१ महाराष्ट्र पोलीस आर्चरी संघास प्रथमच इतिहासामध्ये पदक प्राप्त

## (१ सुवर्ण, १ रौप्य व २ कांस्य पदक)

४०वी वरिष्ठ राष्ट्रीय आर्चरी स्पर्धा - २०२१ दि. १ ते ९ ऑक्टोंबर २०२१ मध्ये, झारखंड येथे पार पडली. महाराष्ट्र पोलीस दलामधील आर्चरी खेळाडू मपोशि/२२६९, मोनाली जाधव, नेमणूक - बुलडाणा यांची निवड अखिल भारतीय पोलीस क्रीड नियंत्रण मंडळ, नवी दिल्ली व पोशि/१९७, दिगंबर चव्हाण - रा.रा.पो.बल गट क्र. १०, सोलापूर यांची निवड ही महाराष्ट्र राज्य आर्चरी संघाकडून करण्यात आली. महाराष्ट्र पोलीस दलामधील आर्चरी खेळाडूंनी प्रथमच इतिहासामध्ये वरिष्ठ आर्चरी स्पर्धेमध्ये पदक प्राप्त कामगिरी करुन इतिहास रचलेला आहे.

मपोशि/२२६९, मोनाली जाधव यांनी **४०वी वरिष्ठ राष्ट्रीय आर्चरी स्पर्धा - २०२१** स्पर्धेमध्ये कंपाऊंड मिक्स या प्रकारामध्ये **सुवर्ण पदक** प्राप्त केले तसेच **कंपाऊंड सांघीक** या प्रकारामध्ये **कांस्य पदक** प्राप्त केले करुन **महाराष्ट्र पोलीस दलाचे व भारतीय पोलीस दलाचे नाव लौकीक केलेले आहे. स्पर्धेमध्ये पदक प्राप्त कामगिरी केल्याने मपोशि/मोनाली जाधव यांची आगामी आशियाई आर्चरी चॅम्पियनशीप स्पर्धेच्या निवड चाचणीकरीता निवड झाली आहे.**

पोशि/१९७, दिगंबर चव्हाण - रा.रा.पो.बल गट क्र. १०, सोलापूर यांनी इंडियन राऊंड मिश्र या प्रकारामध्ये **रौप्य पदक** प्राप्त केले. त्याचबरोबर **५० मी. वैयक्तीक** प्रकारामध्ये ३६० पैकी ३२५ गुण प्राप्त करुन **कांस्य पदक** प्राप्त केले आहे.

कोरोना - १९ या महामारीच्या मुळे सरावामध्ये खंड पडून सुध्दा आणि कोरोनो नियमांचे काटेकोर पणे पालन करुन आपल्या सरावामध्ये सातत्य राखून सदर खेळाडूंनी अतिशय उत्कृष्ठ कामगिरी केली आहे. सहा. प्रशिक्षक/ समन्वयक पोह/१४२, सुरेश शिंदे - रा.रा.पो.बल.गट.८ गोरेगाव, मुंबई यांनी खेळाडूंकडून उत्कृष्ठ प्रकारे सराव घेवून वेळोवळी त्यांना प्रोत्साहन केले. सदर आर्चरी खेळाडू प्रशिक्षणार्थी साठी आज प्रेरणादायी ठरत आहे.

महाराष्ट्र पोलीस आर्चरी संघाची आजपर्यंतची वरिष्ठ आर्चरी स्पर्धेमधील सर्वोत्कृष्ठ कामगिरी असून श्री. संजय पांडे, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, श्री. अनुपकुमार सिंग, अपर पोलीस महासंचालक, (प्रशासन) म. रा. मुंबई, सहाय्यक क्रीडा अधिकारी श्री. जुनेद खान, आणि सहा.प्रशिक्षक/समन्वयक - सुरेश शिंदे, यांनी वेळोवेळी त्यांना प्रोत्साहन देवून मार्गदर्शन केले. त्याचबरोबर त्यांच्यामधील उणिवा दूर करुन खेळातील कार्यक्षमता व मानसिक संतुलन उच्चतम राहिल असे वातावरण तयार केले. अशा केलेल्या प्रयत्नामुळे व मार्गदर्शनामुळे महाराष्ट्र राज्य पोलीस दलामधील खेळाडू राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकत आहेत.

Junaidkhan 11/10/2021.

(जुनेद खान)

सहाय्यक क्रीडा अधिकारी,

महाराष्ट्र राज्य पोलीस, मुंबई.